**नि.फौ.ख.क्र. ८०/२०१५**

**सरकार –वि– संजय जाधव**

**निशाणी क्र. ७५ खाली**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ सुनंदा सिताराम जाधव यांचा उर्वरित उलटतपास आरोपीचे विधिज्ञ श्री. डी. आर. गांगुर्डे यांच्यातर्फे शपथेवर सुरु.**

२. दि.०७.०१.२०१५ रोजी मी, माझा मुलगा प्रशांत, विजय जाधव, सिताराम जाधव असे संध्याकाळी ५:०० च्या दरम्यान घरी चालतो होतो असे माझ्या फिर्यादमध्ये का नमुद नाही. त्याचे कारण मला सांगता येणार नाही. तसेच पुढे नाल्याजवळ गेल्यावर दिनकर जाधव, धर्मेंद्र जाधव, संजय जाधव, रविंद्र भांबर, मुकूंद भांबर, निलेश भांबर, निर्मला भांबर, विमल जाधव यांनी आम्हाला अडवले असा मजकूर माझ्या फिर्यादमध्ये का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. फिर्यादमधले पॉईट चुकीचे आहेत.

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी आम्हाला ट्रॅक्टर आडवा घातला व विजय ला आ.क्र. १ ने गाडीवरुन ओढून घेतल्याचा मजकूर माझ्या फिर्यादमध्ये नमुद नाही. हा सर्व मजकूर माझ्या फिर्यादमध्ये का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. साक्षीदार पुन्हा सांगते की, आरोपींनी आमच्यावर प्राणघातक हल्ला केल्यामुळे हा सर्व मजकूर माझ्या फिर्यादमध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, आ.क्र. २ ने मला काठीने पायावर, पोटावर, हातावर मोठया प्रमाणात मारल्याचा मजकूर फिर्यादमध्ये नमुद नाही. माझे शिक्षण इयत्ता १० वी पर्यंत झालेले आहे. मला लिहिता वाचता येते. साक्षीदार पुन्हा सांगते की, आ.क्र. २ ने मला काठीने पायावर, पोटावर, हातावर मोठया प्रमाणात मारल्याचा मजकूर फिर्यादमध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, आ.क्र. ३ व ५ ने मला सोडवण्यासाठी आलेला माझा भाचा सोपानला काठीने मारहाण केली हा मजकूर माझ्या फिर्यादमध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी फिर्यादमधील मजकूर त्यांच्या मर्जीप्रमाणे लिहिला.

४. हे म्हणणे खरे आहे की, आ.क्र. ४ व आ.क्र. ३ ने माझा मुलगा प्रशांतला काठीने मारल्याचा मजकूर फिर्यादमध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथित फिर्याद पोलिसांनी मला वाचून दाखवली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथित घटनेवेळी सर्व आरोपींकडे काठ्या व गज होते हा मजकूर फिर्यादमध्ये नमुद नाही. फिर्याद पोलिसांनी खोटी लिहिली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी आम्हाला तुम्हाला गावात राहू देणार नाही, तुम्हाला कापून टाकू अशी धमकी दिल्याचा मजकूर माझ्या फिर्यादमध्ये नमुद नाही.

५. कुऱ्हाडबाबत माझ्या फिर्यादमध्ये का नमुद केले नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. आरोपींकडे जे प्राणघातक हत्यार होते ते न्यायालयासमोर दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी ताराबाई मधूकर पवार ही मला सोडवण्यासाठी आली असता तिला देखील मारहाण केल्याचा मजकूर माझ्या फिर्यादमध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, किरण मधूकर पवार हा वाद सोडवण्यासाठी आला असता त्याला देखील आरोपींनी मारहाण केल्याचा मजकूर माझ्या फिर्यादमध्ये नमुद नाही.

**न्यायालयाची वेळ संपल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.03.27 17:37:37 +0530

**दि. २७.०३.२०२६**

**(वृषाली दी. सुंगारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**क.स्तर चांदवड.**